## जनसंपर्क विभाग

**बातमी क्र.१**

जळगाव दि.३१ ( ):- नागपूर येथे काल पार पडलेल्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या राज्यस्तरीय उत्कर्ष या सामाजिक व सांस्कृतिक स्पर्धेत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संघाने चार पारितोषिके पटकावली.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ येथे २७ ते ३० जानेवारी दरम्यान उत्कर्ष स्पर्धा झाली. या स्पर्धेत माधुरी पाटील (जी.डी.बेंडाळे महिला महाविद्यालय,जळगाव) या विद्यार्थिनीला निबंध स्पर्धेत प्रथम , धर्मेश हिरे (विद्यावर्धिनी महाविद्यालय, धुळे) याला वक्तृत्व स्पर्धेत तृतीय तसेच अविनाश पाटील (प्रताप महाविद्यालय, अमळनेर) याला काव्य वाचनात तृतीय आणि बिजल राणा (कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नवापूर) या विद्यार्थिनीला चित्रकला स्पर्धेत द्वितीय पारितोषिक प्राप्त झाले. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला ही चार पारितोषिके प्राप्त झाल्याबद्दल कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांनी विद्यार्थ्यांचा सत्कार केला. यावेळी प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर, कुलसचिव भ.भा.पाटील, व्यवस्थापन परिषद सदस्य दिलीप पाटील, प्रा.एस.टी.इंगळे, परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक बी.पी.पाटील, प्रभारी वित्त व लेखाधिकारी एस.आर.गोहिल, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक प्रा.सत्यजित साळवे यांनीही विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

विद्यापीठाच्या या संघात १९ जण सहभागी झाले होते. संघ व्यवस्थापक म्हणून डॉ.नामदेव गजरे (कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नवापूर) यांनी काम पाहिले. या संघात जयेश साळुंखे, राजू तडवी, आकाश धनगर, भूषण भदाणे, रोहित पवार,आशिष पाडवी, कृष्णा कोकणी, ऐश्वर्या झोपे, पुनम पवार, तेजस्वीनी तायडे, हेमलता जिरे, गुंटूर कुजानकीकाव्या, निता पावरा, सोनाली कोकणी या विद्यार्थ्यांचा समावेश होता.

---

**बातमी क्र.२**

जळगाव दि. ३१ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील पर्यावरण आणि भूशास्त्र प्रशाळा व विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी संशोधन प्रकल्प सादरीकरण स्पर्धा घेण्यात आली.

या स्पर्धेचे उद्‌घाटन विद्यार्थी विकास विभागाचे संचालक प्रा.सत्यजित साळवे यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी डॉ.संजयकुमार थोरात होते. प्रारंभी समन्वयक डॉ.व्ही.एम.रोकडे यांनी प्रास्ताविक केले. प्रा.थोरात यांनी संशोधनाचे महत्व विशद केले. या स्पर्धेत ८० स्पर्धकांनी भाग घेतला. यावेळी प्रा.एस.एन.पाटील, प्रा.अत्तरदे उपस्थित होते.

---

जा.क्र.कबचौ उमवि/१६/हस्तदेय/२०१९ दिनांक:- ३० जानेवारी, २०१९

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी